प्रेस नोट दिनांक ११/०१/२०२४

श्री. चंपालाल महाजन डेढवाल, वय. ३९ वर्षे, महसुल सहाय्यक, तहसीलदार कार्यालय खेड ता. खेड जि. रत्नागिरी यांना लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडलेबाबत...

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | रत्नागिरी युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | खेड पोलीस ठाणे गु रजि.नं. /२०२३ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. चंपालाल महाजन डेढवाल, महसुल सहाय्यक, तहसीलदार कार्यालय खेड ता. खेड जि. रत्नागिरी |
| मागितलेली लाचेची रक्कम | ३,०००/-रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३,०००/- रुपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार व त्यांचे सहकारी यांचेविरुध्द सुरु असलेली चॅप्टर केसचे प्रकरण मिटवुन देतो असे सांगुन आरोपी लोकसेवक श्री. चंपालाल डेढवाल यांनी तक्रारदार यांचेकडे ३०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली होती. म्हणुन तक्रारदार यांनी दिनांक २८/१२/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी यांचेकडे लेखी तक्रार दिली होती.<br>नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २८/१२/२०२३ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक चंपालाल डेढवाल यांनी तक्रारदार यांच्याविरुध्द सुरु असलेले चॅप्टर केस प्रकरण मिटवुन देतो असे सांगुन तक्रारदार यांचेकडे ३,०००/-रुपये लाच रक्कमेची मागणी करुन मागणी केलेली लाच रक्कम स्विकारणार असल्याचे मान्य केल्याचे पडताळणी कारवाईमध्ये निष्पन्न झालेले आहेत.<br>पडताळणीमध्ये निष्पन्न झालेनुसार नमुद चॅप्टर केस मिटवुन देतो असे सांगुन लोकसेवक चंपालाल डेढवाल यांनी तक्रारदार यांचेकडुन दिनांक ११/०१/२०२४ रोजी तहसीलदार कार्यालय खेड येथील पुरुष प्रसाधनगृहामध्ये ३०००/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यानंतर लोकसेवक चंपालाल डेढवाल यांना दिनांक ११/०१/२०२४ रोजी १२.५७ वाजता महसुल शाखा, तहसीलदार कार्यालय खेड येथे पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले आहे. |

मार्गदर्शन अधिकारी-मा. सुशांत बं. चव्हाण, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी

तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्र विभाग यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता - लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१

संकेतस्थळ -acbratnagiri@gmail.com

टोल फ्रि नंबर- १०६४/ दुरध्वनी क्रमांक- ०२३५२-२२२८९३

१) श्री. सुशांत बंडोपंत चव्हाण, पोलीस उप अधीक्षक लाप्रवि, रत्नागिरी-९८२३२२३०४४

२) श्री. अनंत कांबळे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि रत्नागिरी - ७५०७४१७०७२

३) श्री. शहानवाज मुल्ला, पोलीस निरीक्षक, लाप्रवि रत्नागिरी - ७७७४०९७८७४

(शहानवाज मुल्ला)
पोलीस निरिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी.